# श्री स्वामी माला मंत्र

॥ श्रीगणेशाय नमः ॥

जगदंबिका म्हणे । मालामंत्र नारायणे ।
कथिला जो जगत्कारणे। तो हा सर्वोत्तम असे ॥

ॐ नमो नमो भगवंता। नमोजी श्री स्वामी समर्था ।
स्मरणगामी दत्तनाथा । योगीमुनिजनवंदिता ॥

चिदानंदात्मकात्र्यंबका। विश्वेश्वरा विश्वधारका ।
बालोन्मत्ता पिशाच्चवेषा। महायोगीश्वरा परमहंसा ॥

चित् चैतन्या चिरंतना । अवधूता निरंजना ।
जगदाधारा सुदर्शना। सुखधामा सनातना ॥

सकलकामप्रदायका । सकलदुरितदाहका ।

सकल संचित कर्महरा । सकल संकट विदारा ॥

ॐ भवबंधमोचना । ॐ श्री परम ऐश्वर्यघना।

ॐ स्वां स्वहितधर्मचालका । ॐ मां नित्यदायका ॥

ॐ संसारचक्र छेदका । ॐ मां महाज्ञानप्रदायका ।

ओमर्थ महावैराग्य-साधका। ॐ नं नरजन्मसार्थका ॥

ॐ भवबंधमोचना । ॐ श्री परम ऐश्वर्यघना।

ॐ स्वां स्वहितधर्मचालका। ॐ मां नित्यदायका ||

ॐ संसारचक्र छेदका । ॐ मां महाज्ञानप्रदायका ।

ओमर्थ महावैराग्य-साधका। ॐ नं नरजन्मसार्थका ॥

ॐ मां महाभयनिवारका । ॐ भक्तजनहृदयनिवासा ।

परकृत्या थोपव थोपव । परमंत्रा शांतव शांतव ॥

परयंत्रा विखर विखर । ग्रहभूतादिपिशाच्च पीडा हर हर।

दारिद्र्यदुःखा घालव घालव । सुखशांती फुलव फुलव ॥

आपदा विपदा मालव मालव । गृहदोष वास्तुदोष ।

पितृदोष सर्पदोषादि । सर्वदोषा विरव विरव ॥

अहंकारा नासव नासव। मन चित्तबुद्धी स्थिरव स्थिरव ।

नमोजी नमो देव महादेव ।देवाधिदेव श्री अक्कलकोट स्वामी समर्थ गुरुदेव ॥

**नमो नमो नमो नमः ॥ (सप्तशते सिद्धिः ) ||**

**॥ हरि ॐ ॥**

HANUMAN
CHALIASA